स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका
निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी
उमेदवारांकरिता “वेळ (Time) आणि रित
(Manner)” निश्चित करणेबाबत ...

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल: sec.mh@gov.in
दिनांक:- २४ जानेवारी, २०२३.

वाचा: आयोगाचे क्रमांक:रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष,
दि.११ ऑक्टोबर, २०१६ रोजीचे आदेश.

## आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी उमेदवारांकरिता “वेळ (Time) आणि रित (Manner)” निश्चित करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दि.११ ऑक्टोबर, २०१६ रोजी आदेश निर्गमित केले होते. या आदेशाच्या परिशिष्ट- ९.१ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांनी शेड्यूल बँकेमध्ये एक स्वतंत्र खाते उघडावे व त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

२. या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाकडे अशी विचारणा करण्यात आली आहे की, प्रत्येक निवडणुकांसाठी नवीन खाते उघडणे आवश्यक आहे किंवा पूर्वी उघडलेले बँक खाते याचाच वापर पुढील निवडणुकीत करता येईल किंवा कसे?

३. उपरोक्त प्रश्नाचा विचार करून, पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे:- उमेदवारांनी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातून निवडणुकीसाठी सर्व आर्थिक व्यवहार करावेत, असे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश आहेत. मात्र प्रत्येक निवडणुकीसाठी नवीन

बँक खाते उघडणे आवश्यक नाही. पूर्वी उघडलेल्या बँक खात्यातूनच निवडणूक खर्च करण्यास हरकत नाही. मात्र सदर बँक खात्यात नामनिर्देशनपत्र दाखल करतांना पूर्वीच्या निवडणुकीची कोणतीही रक्कम शिल्लक ठेवता येणार नाही (बँक खात्यासाठी निर्धारित किमान शिल्लक रक्कम वगळून) व नामनिर्देशनपत्रासोबत त्या बँक खात्याचे अद्ययावत पासबूक/ अकाऊंट स्टेटमेंटची स्वसाक्षांकित प्रत नामनिर्देशनपत्र दाखल करतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
उपसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई.
३. मा. सचिव, विधीमंडळ, विधानभवन, मुंबई.
४. मा. प्रधान सचिव, वित्त व नियोजन, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन.
६. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती (सर्व)
१२. राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष/ राज्यस्तरीय पक्ष व नोंदणीकृत राजकीय पक्ष
१३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१४. निवड नस्ती.